# राष्ट्रवादी काँग्रेस गटांच्या संभाव्य एकत्रीकरणाची चर्चा प्रदेशाध्यक्ष जयंत पाटलांनी फेटाळली

**पुणे (प्रतिनिधी)–** राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस गटांच्या संभाव्य एकत्रीकरणाच्या सध्या सुरू असलेल्या चर्चा स्पष्टपणे फेटाळून लावल्या आहेत. पाटील म्हणाले की, अशी कोणतीही चर्चा मचालू नाहीयेफ. प्रसार माध्यमांनाच दोन्ही पक्ष एकत्र यावेत अशी 'तीव्र इच्छा दिसते'.

पुण्यात पत्रकारांशी बोलताना पाटील यांना अजित पवार गटातील नेत्यांच्या मदोन पवार एकत्र आले तर आम्हाला त्याच्यासारखा आनंद होणार नाहीफ या प्रतिक्रियांबद्दल विचारले असता, पाटील यांनी स्पष्ट केले की, एकात्रीकरणाच्या कोणतीही चर्चा चालू नाहीये. वारंवार प्रसार माध्यमातून हा प्रश्न का विचारला जातोय हेच कळलं नाहीफअसेही ते म्हणाले. तुम्ही सर्व प्रसार माध्यम हे दोन्ही पक्षांनी एकत्रित यावं याच्यासाठी अनुकूल वातावरण तयार करण्याचा प्रयत्न करत आहात असे माझे मत आहे असेही त्यांनी नमूद केले.

**ठाकरे बंधूंचे एकत्रीकरण आणि महाविकास आघाडीचे धोरण**

ठाकरे बंधूंच्या (राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे) संभाव्य एकत्रीकरणाच्या चर्चांवरही जयंत पाटील यांनी भाष्य केले. ते म्हणाले की, त्यांच्या चर्चा चालू आहेत किंवा नाहीत, त्यांची इच्छा काय आहे याविषयी मला काही अंदाज नाहीफ. मात्र, राज ठाकरेंना महाविकास आघाडीत स्वागत करण्याबद्दल विचारले असता, पाटील यांनी सकारात्मक भूमिका दर्शविली. ते म्हणाले की, राज ठाकरे प्रभावी वक्ते आहेत यात काही शंका नाही. आणि त्यामुळे आघाडीची ताकद वाढत असेल तर का नाही?, असा सवाल त्यांनी केला. पाटील यांनी स्पष्ट केले की, ममहाविकास आघाडीचं एकत्रित सगळे जे येतील त्यांना बरोबर घेऊन जाऊन महाविकास आघाडी पुढे जाणारी आघाडी आहे. त्यामुळे, शिवसेनेचा निर्णय आहे शिवसेनेने जर ठरवलं की त्यांनी एकत्रित यायचं तर त्यांच सगळ्यांच स्वागत. महाविकास आघाडीची ताकद वाढवण्यासाठी साठी जे आवश्यक आहे, शक्य आहे ते करणं अभिप्रेत आहे.

**भारतीय जनता पक्षाचे नेतेच आयोगाचे प्रवक्ते व्हायला लागलेत**

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या आगामी निवडणुका महाविकास आघाडी म्हणूनच लढणार असल्याचे पाटील यांनी सांगितले. सर्व तिन्ही पक्ष एकत्रित येऊन महाविकास आघाडी म्हणून आमचा निर्णय आहे, असे त्यांनी नमूद केले. पाटील यांनी निवडणूक आयोगाच्या कार्यपद्धतीवरही पुन्हा एकदा प्रश्नचिन्ह उपस्थित केले. राहुल गांधींनी उपस्थित केलेल्या प्रश्नांना निवडणूक आयोगानेच उत्तर देणे अपेक्षित असताना, भारतीय जनता पक्षाचे नेतेच आयोगाचे प्रवक्ते व्हायला लागलेत, अशी टिप्पणी त्यांनी केली. मनिवडणूक आयोगाने उत्तर देणं जिथे अभिप्रेत आहे तिथे इतरांनी उत्तर दिलं तर त्याचं समर्थन करणं शक्य नाही कारण निवडणूक आयोगानेच उत्तर दिलं पाहिजेफ, असे पाटील यांनी सांगितले.

**अज्ञातवासात नसल्याचा खुलासा**

आपल्या अज्ञातवासाबद्दल सुरू असलेल्या चर्चांवरही जयंत पाटील यांनी खुलासा केला. अज्ञातवासात जाण्याचा प्रश्न नाही असे सांगत, आम्ही महाराष्ट्रात आमचं पक्ष उभारणीचं, बांधणीच काम करतो आहोत असे ते म्हणाले. आम्हाला मागच्या विधानसभेनंतर जे अनुभव आले त्यातून पक्ष सुधारण्याचा बळकट करण्याचा आम्ही प्रयत्न करतोय, असे पाटील यांनी सांगितले.

दरम्यान, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचा १० जून रोजी पुण्यात वर्धापन दिन साजरा केला जात आहे. हा कार्यक्रम बालगंधर्व रंग मंदिर येथे आयोजित करण्यात आला आहे. गेल्या वर्षी अहमदनगर येथे प्रचंड पाऊस आणि हवामानामुळे आलेल्या अडचणी लक्षात घेऊन, यावर्षी पावसाचा धोका टाळण्यासाठी हा कार्यक्रम संरक्षित ठिकाणी आयोजित करण्याचा निर्णय घेण्यात आल्याचे पाटील यांनी सांगितले.

# शरद पवार यांच्या शेजारी बसणे अजितदादांनी पुन्हा एकदा टाळले



**पुणे(प्रतिनिधी)–** राष्ट्रवादी काँग्रेसच्या दोन्ही गटांमध्ये एकत्रीकरणाच्या चर्चांना वेग आलेला असतानाच, सोमवारी पुण्यातील मांजरी येथील वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूटमधील कार्यक्रमात उपमुख्यमंत्री अजित पवारांनी राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांच्या शेजारी बसणे पुन्हा एकदा टाळले. गेल्या काही दिवसांपासून शरद पवार आणि अजित पवार यांची विविध कार्यक्रमांच्या माध्यमातून वाढलेल्या जवळीकीच्या आणि दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेसच्या एकत्र येण्याच्या चर्चेच्या पार्श्वभूमीवर अजित पवार यांची ही कृती पुन्हा राजकीय वर्तुळात चर्चेचा विषय ठरली. या घटनेने पवार काका-पुतण्याच्या राजकारणातील सस्पेन्स कायम राहिला आहे. दरम्यान, दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेसचे पुण्यात आज (मंगळवार) स्वतंत्र वर्धापनदिन कार्यक्रम असल्याने कार्यकर्त्यांमध्ये कोणताही 'संभ्रम नको' यासाठीच अजित पवार यांनी हे पाऊल उचलले असावे, अशी चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे.

**कार्यकर्त्यांमध्ये कोणताही 'संभ्रम नको' म्हणून?**

वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूटमधील कार्यक्रमात आयोजकांनी प्रोटोकॉलनुसार केलेली बैठक व्यवस्था स्वतः बदलत, अजित पवारांनी ही 'सावध भूमिका' घेतली असून, आज (मंगळवार दि. १० जून) दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेसचे पुण्यात स्वतंत्र वर्धापनदिन कार्यक्रम असल्याने कार्यकर्त्यांमध्ये कोणताही 'संभ्रम नको' यासाठीच त्यांनी हे पाऊल उचलले असावे, अशी चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे.

राष्ट्रवादीत दोन गट पडल्यानंतर सुरुवातीचे एक वर्ष अजित पवारांनी शरद पवारांसोबत कोणत्याही कार्यक्रमासाठी एकत्र येणे टाळले होते. मात्र, राज्य सरकारमध्ये त्यांच्या पक्षाची कोंडी होत असल्याचे चित्र निर्माण झाल्यावर, ते शरद पवारांच्या पुन्हा जवळ येत असल्याचे दिसू लागले. व्हीएसआयने एआय तंत्रज्ञानासंबंधी आयोजित केलेल्या तब्बल पाच बैठकांसाठी अजित पवार आणि शरद पवार एकत्र आले होते. त्यातूनच दोन्ही राष्ट्रवादी एकत्र येण्याची चर्चा सुरु झाली होती.

सोमवारी (दि. ९ जून) वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूटमध्ये ऊस उत्पादक शेतकऱ्यांना एआय (आर्टिफिशियल इंटेलिजन्स) तंत्रज्ञानाची माहिती देण्यासाठी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. मात्र, सगळ्यांच्या नजरा शरद पवार आणि अजित पवारांवर खिळल्या होत्या. कारण मंगळवारी दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेसकडून पुण्यात स्वतंत्र वर्धापन दिनाचे कार्यक्रम आयोजित केलेले असल्याने, व्हीएसआयच्या या कार्यक्रमाची चर्चा होणे स्वाभाविकच होते.

या कार्यक्रमात अजित पवारांनी नावांच्या पाट्यांची अदलाबदल करत शरद पवारांच्या शेजारी बसण्याचे टाळले. व्हीएसआयच्या व्यवस्थापनाने स्टेजवर शरद पवारांच्या शेजारी अजित पवारांच्या बसण्याची व्यवस्था केली होती, जे प्रोटोकॉलनुसार योग्य होते. कारण शरद पवार व्हीएसआयचे अध्यक्ष आहेत तर अजित पवार हे विश्वस्त आणि राज्य मंत्रिमंडळातील सर्वात वरिष्ठ मंत्री आहेत. मात्र, अजित पवारांनी स्वतःच्या हाताने आपली नावाची नेम प्लेट उचलून त्याजागी सहकारमंत्री बाबासाहेब पाटील यांच्या नावाची नेम प्लेट सरकवली. त्यामुळे बाबासाहेब पाटलांना काका-पुतण्यामध्ये बसण्याची वेळ आली.

अजित पवारांच्या या कृतीमुळे राजकीय वर्तुळात अनेक चर्चांना उधाण आले आहे. मंगळवारी दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेसचे स्वतंत्र मेळावे होणार असताना, अजित पवारांनी कार्यकर्त्यांमध्ये उगीच संभ्रम नको म्हणून 'सावध भूमिका' घेतली का? अशीही चर्चा आता रंगली आहे.

**दोन्ही राष्ट्रवादीचे आज वेगवेगळ्या ठिकाणी वर्धापन दिन**

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरद पवार गट) आणि राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (अजित पवार गट) या दोन्ही गटांकडून आज (१० जून) पक्षाचा वर्धापन दिन स्वतंत्ररीत्या वेगवेगळ्या ठिकाणी साजरा करण्यात येणार आहे. त्यामुळे पुणे शहरात या दोन्ही गटांच्या कार्यक्रमांकडे संपूर्ण महाराष्ट्राचे लक्ष लागले आहे.

शरद पवार यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचा वर्धापन दिन सोहळा आज (१० जून) सकाळी १० वाजता बालगंधर्व रंगमंदिर, पुणे येथे पार पडणार आहे. या मेळाव्यात शरद पवार कार्यकर्त्यांशी संवाद साधणार असून, आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर काही महत्त्वाची भूमिका स्पष्ट होण्याची शक्यता आहे.

दुसरीकडे, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी गटाचा वर्धापन दिन मेळावा आज (१० जून) दुपारी १ वाजता श्री शिवछत्रपती क्रीडा संकुल, बालेवाडी, पुणे येथे आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमात अजित पवार कार्यकर्त्यांशी थेट संवाद साधणार आहेत.

महानगरपालिका निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर या दोन्ही नेत्यांकडून कोणती राजकीय रणनीती जाहीर होते, कोणती नवी दिशा दिली जाते आणि पक्षकार्यकर्त्यांना काय संदेश दिला जातो, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# परप्रांतीय लोंढेच मुंब्रा रेल्वे अपघाताला जबाबदार- राज

**पुणे (प्रतिनिधी)–** परप्रातांमधून मुंबईत रोज येऊन आदळणारे लोंढेच मुंब्रा रेल्वे अपघाताला जबाबदार असल्याचा संताप मनसे प्रमुख राज ठाकरे यांनी सोमवारी येथे व्यक्त केला.

मनसेच्या बैठकीसाठी राज ठाकरे पुण्यात आले होते. त्यानंतर माध्यमांशी ते बोलत होते. शहराध्यक्ष साईनाथ बाबर, प्रदेश सरचिटणीस हेमंत संभूस, प्रदेश प्रवक्ते योगेश खैरे तसेच मनसेचे अन्य स्थानिक पदाधिकारी या वेळी उपस्थित होते. ठाकरे म्हणाले, सध्या रेल्वेच्या कारभाराचा पार बोजवारा उडाला आहे. मुंबईत लोकलमध्ये लोक येतात कुठून, जातात कुठून, काहीही कळत नाही. याची व्यवस्था लावण्यासाठी मुंबईतील लोकांनी रेल्वे मंत्रालयाला एक स्वतंत्र महामंडळ स्थापन करा, असे सांगितले होते. त्याचे काय झाले, हे कोणालाही माहिती नाही. मेट्रो, पूल उभारले जात आहेत, रिडेव्हलपमेंटच्या नावाखाली उंचच उंच इमारती उभ्या रहात आहेत. या सगळय़ांना वाहनतळ नाही, पण त्याविषयीही कोणीही काही बोलत नाही. पुणे, मुंबई, ठाणे अशा शहरांमध्ये कुठे आत आग लागली, तर तिथे फायरब्रिगेडची गाडीही जाऊ शकत नाही, अशी परिस्थिती आहे. शहरांचे नियोजन नावाची गोष्टच आपल्याकडे नसल्याबाबत मी अनेकदा बोलतो, मुलाखतींमध्ये सांगतो, मात्र त्याला महत्व दिले जात नाही. आमच्या एकत्रिकरणाच्या बातम्या लावल्या जातात. पण, प्रश्न वेगळेच आहेत. मेट्रो, उड्डाणपूल करून नव्या खासगी वाहनांच्या नोंदी होणे थांबले आहे का? तर थांबलेले नाही. मग हे पूल, मेट्रो, रस्ते वापरतात तरी कोण? कधीतरी याचा विचार केला जाणार आहे का, असा सवाल त्यांनी उपस्थित केला.

# कसोटी क्रिकेट संपले, तर खरे क्रिकेटच संपून जाईल- वेंगसरकर

**पुणे (प्रतिनिधी)–** आंतरराष्ट्रीय क्रिकेट किती टिकेल माहीत नाही. पण, कसोटी क्रिकेट संपले, तर खरे क्रिकेटच संपून जाईल, अशी भीती भारतीय क्रिकेट निवड समितीचे माजी अध्यक्ष आणि माजी कर्णधार दिलीप वेंगसरकर यांनी सोमवारी व्यक्त केली.

पुणे पत्रकार संघाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या पत्रकार संघाचे संस्थापक कै. ज. स. करंदीकर व्याख्यानमालेत ते बोलत होते. या वेळी पत्रकार संघाचे अध्यक्ष सुनीत भावे, सरचिटणीस मिनाक्षी गुरव उपस्थित होते.

दिलीप वेंगसरकर म्हणाले, कसोटी क्रिकेट हा या खेळाचा आत्मा आहे. परंतु, अलीकडे आपल्याकडे झटपट क्रिकेटला प्राधान्य देण्यात येत असल्याबद्दल त्यांनी चिंता व्यक्त केली. इंग्लंड आणि ऑस्ट्रेलिया येथील प्रेक्षक मर्यादित षटकांच्या क्रिकेटपेक्षा कसोटी अधिक पसंत करतात, कारण कसोटी स्पर्धेत शारीरिक आणि मानसिक संयमाचा कस लागतो, असे त्यांनी स्पष्ट केले. कसोटी क्रिकेट संपले, तर खरे क्रिकेटच संपून जाईल, अशी भीती त्यांनी व्यक्त केली. इंग्लंडच्या दौऱ्यावर सध्या भारतीय संघ गेला आहे. पहिल्या दोन टेस्ट मॅच या सिरीजचा रिझल्ट ठरवतील. इंग्लंडमध्ये बॉल स्विंग होत असतात. आपला संघ जेवढा तिथल्या वातारणाशी जेवढे लवकर जुळवून घेईल, तेवढे चांगले आहे. शुभमन गिल, यशस्वी जसवाल, के. एल. राहुल यांच्याकडे या मालिकेच्या निमित्ताने चांगली संधी आहे. सगळेच म्हणतात या संघाकडे अनुभव नाही. पण, खेळल्याशिवाय अनुभव येणारच नाही. भारताची टीम स्ट्राँग आहे. त्यामुळे आपला संघ तिथे चांगली कामगिरी करेल, अशी आशाही त्यांनी व्यक्त केली.

**श्रेयस अय्यर संघात हवा होता**

श्रेयस अय्यर आणि माझी भेट झाली. तेव्हा त्याला सांगितले, की दुखापतग्रस्त होऊ नको. फिटनेस चांगला ठेव. श्रेयस अय्यरची निवड इंग्लंडच्या दौऱ्यात व्हायला हवी होती. गिल हा गेली पाच ते सहा वर्षे इंटरनॅशनल क्रिकेट खेळत आहे. त्यामुळे त्याच्या हातात भारताचे टेस्ट क्रिकेटचे भविष्य सुरक्षित आहे, असेही वेंगसरकर यांनी सांगितले.

**दुलीप, इराणी ट्रॉफीवर भर दिला पाहिजे**

पैशाने क्रिकेटची भूक मंदावली आहे. खेळासाठी कोणी काही करत नाही. आपण दुलीप, इराणी ट्रॉफीवर भर दिला, तर चांगले क्रिकेटर आपल्याला मिळतील. आपल्याकडे १४, १६ आणि १९ वर्षांखालील चांगले क्रिकेट आहे. मुळात या मातीत टॅलेंट आहे. पण, व्यासपीठ मिळत नाही, अशी खंतही त्यांनी व्यक्त केली.

# राहाता बाजार समितीत डाळींब २०५ रुपये किलो

**राहाता (तालुका प्रतिनिधी)–** राहाता बाजार समितीत सोमवारी सोमवारी डाळींबाला जास्तीत जास्त प्रतिकिलो २०५ रुपये भाव मिळाला. डाळींबाच्या २९२७ कॅरेटची आवक झाली.

डाळींब नंबर १ ला १४६ ते २०५ रुपये भाव मिळाला. डाळींब नंबर २ ला ९१ ते १४५ रुपये भाव मिळाला. डाळींब नंबर ३ ला ५१ ते ९० रुपये भाव मिळाला. डाळींब नंबर ४ ला १० ते ५० रुपये भाव मिळाला. सोयाबीनच्या ५ क्विंटलची आवक झाली. सोयाबीनला किमान ४१०० रुपये, जास्तीत जास्त ४१३० रुपये तर सरासरी ४१५० रुपये भाव मिळाला. ज्वारीला सरासरी २५०० रुपये प्रतिक्विंटलला भाव मिळाला, अशी माहिती सभापती ज्ञानेश्वर गोंदकर व सचिव सुभाष मोटे यांनी दिली.

# उख्खलगावः ढगफुटी सदृश पाऊस

## एकाचा मृत्यू : शेतजमिनी पिकांसह वाहून गेल्याने वित्तहानी

**श्रीगोंदा (तालुका प्रतिनिधी)–** श्रीगोंदा तालुक्यातील उख्खलगाव परिसरात रविवार (दि. ८) रोजी दुपारी तीन वाजता ढगफुटी सदृश जोरदार पाऊस झाला. जोरदार पावसाने आलेल्या पुराच्या पाण्याचा अंदाज न आल्याने डोंगरावर जनावरांना चरायला घेऊन गेलेल्या भाऊसाहेब हरिभाऊ कोरेकर ही व्यक्ती पाण्यात वाहून गेल्याने मृत्यू झाल्याची घटना घडली. तर अनेक घरांच्या भिंती पडल्याने तसेच जोरदार पावसामुळे अचानक आलेल्या पाण्याच्या लोंढ्याने शेतजमिनी पिकांसह वाहून गेल्याने मोठ्या प्रमाणात वित्तहानी झाली. पुरामुळे विसापूर-पारनेर रस्त्यावरील पुलावरून पाणी वाहत असल्याने हा रस्ता रात्री उशिरापर्यंत वाहतूकीसाठी बंद होता.

याबाबत अधिक नुसार तालुक्यातील विसापूर, उख्खलगाव, सुरेगाव परिसरात रविवारी दुपारी वादळी वाऱ्यासह जोरदार पावसाचे आगमन झाले होते. दुपारी चार वाजण्याच्या सुमारास उख्खलगाव परिसरातील खंडोबा मंदिराच्या डोंगरावर अचानकपणे ढगफुटी सदृश पावसाला सुरुवात होऊन डोंगराच्या उतारावरील पाणी साठवण्यासाठी केलेल्या ताली फुल होऊन वाहू लागल्या तर काही ताली फुटल्याने पाण्याचा लोंढा अचानक वाहून परिसरातील ओढ्यावर पूर परिस्थिती निर्माण झाली.



डोंगरावर चरण्यासाठी नेलेले जनावरे माघारी घेऊन जात असताना ओढ्याला अचानक आलेल्या पुरामध्ये काही जनावरे बाहेर निघाली तर काही वाहू लागल्याने त्यांना वाचविण्याच्या प्रयत्नात पाण्याचा अंदाज न आल्याने कोरेकर हे पाण्यात वाहून गेले.

स्थानिक तरुणांच्या मदतीने रात्री आठ वाजण्याच्या सुमारास त्यांचा मृतदेह सापडविण्यात यश आले. अचानक आलेल्या पुराच्या पाण्याने परिसरातील शेतजमिनी पिकांसह वाहून गेल्या, परिसरातील फळबागांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. जोरदार पावसाने तीन ते चार घरांच्या भिंती पडल्याने मोठ्या प्रमाणात वित्तहानी झाली. विसापूर-पारनेर रस्त्यावरील पुलावरून पाणी वाहत असल्याने हा रस्ता रात्री उशिरापर्यंत वाहतूकीसाठी बंद असल्याने रविवारी विसापूर येथील आठवडे बाजार असल्याने बाजारासाठी रांजणगाव मशीद, बाबूर्डी, कडूस, तालुक्यातील चांभूर्डी, सारोळा सोमवंशी व उखलगाव येथून आलेल्या नागरिकांची पुरामुळे तारांबळ उडाली.

पान १ वरुन

## पीओपी गणेश मूर्तींवरील बंदी...

करण्यास कोणताही अडथळा राहिलेला नाही.

**न्यायालयात नेमकं काय घडलं?**

कोणत्याही परिस्थितीत नैसर्गिक जलसाठ्यांमध्ये पीओपी मूर्तीचे विसर्जन करण्यास परवानगी दिली जाणार नाही, असं न्यायालयाने स्पष्ट केलं. मुख्य न्यायाधीश आलोक आराधे आणि न्यायमूर्ती संदीप मारणे यांच्या खंडपीठाने हा निकाल दिला असून काही अटी घातल्या आहेत. पीओपी मूर्तींच्या विसर्जनाबाबत आता राज्य सरकारला विवेकबुद्धी वापरावी लागेल आणि निर्णय घ्यावा लागेल, असंही खंडपीठाने स्पष्ट केलं आहे.

राज्याचे महाधिवक्ता डॉ. बिरेंद्र सराफ यांनी मोठ्या मूर्तींसाठी न्यायालयाकडे काही सवलत मागितली. मोठ्या मूर्ती (२० फूट आणि त्याहून अधिक उंचीच्या) आपल्या संस्कृतीचा भाग बनल्याचं त्यांनी सांगितलं.

जर मंडळांनी कायमस्वरूपी त्याच मूर्तीचा वापर केला तर राज्य त्यात अडथळा आणणार नाही, असं एजी सराफ म्हणाले. यावर सीजे आराधे यांनी, तुम्ही निर्णय घ्या, असं म्हटलं आहे.

## गोल्ड लोनसाठी नवीन नियम

देण्यात आली आहे.सोन्याचे दागिने: १ किलो, सोन्याचे नाणे: ५० ग्रॅम, चांदीचे दागिने: १० किलो, चांदीची नाणी: ५०० ग्रॅम

**कर्ज फेडल्यानंतर सोने लवकर परत मिळेल**

आता कर्ज बंद केल्यानंतर त्याच दिवशी किंवा जास्तीत जास्त ७ कामकाजाच्या दिवसांत सोने किंवा चांदी परत करणे आवश्यक असेल. तसेच विलंब झाल्यास बँकेला प्रत्येक दिवसासाठी ग्राहकांना ५००० रुपये भरपाई द्यावी लागेल.

**नुकसान झाल्यास पूर्ण भरपाई**

याशिवाय बँकेच्या चुकीमुळे तारण ठेवलेले सोने किंवा चांदी हरवले किंवा खराब झाले तर ग्राहकाला पूर्ण भरपाई दिली जाईल.

**पारदर्शक लिलाव प्रक्रिया**

ग्राहक कर्ज फेडू शकला नाही आणि बँक सोन्याचा लिलाव करत असेल, तर लिलावापूर्वी नोटीस द्यावी लागेल. राखीव किंमत बाजारभावाच्या ९०% पेक्षा कमी नसावी (दोन अयशस्वी लिलावांनंतर ८५%). लिलावातील उर्वरित रक्कम सात दिवसांच्या आत ग्राहकांना परत करावी लागेल.

**स्थानिक भाषेत माहिती**

त्याचवेळी, कर्जाच्या अटी आणि मूल्यांकन ग्राहकाच्या स्थानिक भाषेत दिले जाईल. ग्राहक निरक्षर असल्यास त्याला साक्षीदाराच्या उपस्थितीत माहिती दिली जाईल.

## एआयसाठी २५ हजार बिनव्याजी कर्ज

रुपये योगदान देईल, तर उर्वरित रक्कम संबंधित साखर कारखाना देणार आहे. महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेचे प्रशासक विद्याधर अनास्कर यांनी यापूर्वीच सांगितले होते की, ऊस शेतीमधील 'एआय'साठी राज्य सहकारी बँक साखर कारखान्यांना ६ टक्के व्याजदराने ५०० कोटी रुपये देईल.

## राहुरी शहरात मालवाहतूक ट्रक...

एमएच १७ सीव्ही ५१९१ ही त्या ट्रकला ओव्हरटेक करीत होती. मात्र ट्रक उलटून त्या स्कूल बसवर पडला. या स्कूल बस मध्ये चार ते पाच जण आणि चालक आकाश कोते होते. त्यांनी प्रसंगावधान राखत ट्रक उलटल्याचे पाहून बसच्या दुसऱ्या बाजूला उडी घेतल्याने ते बालंबाल बचावले. मात्र स्कूल बसचे मोठे नुकसान झाले.

या घटनेनंतर पोलीस प्रशासनाने अपघातग्रस्त वाहने महामार्गावरून बाजूला काढण्यासाठी दोन क्रेनला पाचारण करण्यात आले. जवळपास दोन तास दोन्ही क्रेनच्या साहाय्याने ही वाहने बाजूला काढण्याचे प्रयत्न सुरू होते. मात्र, वाहने जागेवरून हलत नव्हते. यामुळे नगर-मनमाड महामार्गावरील दोन्ही बाजूची वाहतूक पूर्णपणे ठप्प झाली होती. पोलीस प्रशासनास रात्री १० वाजण्याच्या ही अपघातग्रस्त वाहने बाजूला करण्यात यश आले. त्यानंतर वाहतूक सुरळीत करण्याचे काम पोलिस आणि सुज्ञ नागरिक करीत होते.

## संघटनेतील पदाधिकारी वगळून...

कार्यकर्त्यांची कार्यशाळा पार पडली. सुरुवातीला पालकमंत्री विखे पाटील यांनी उपस्थित कार्यकर्त्यांची मते जाणून घेतली. यावेळी रेखा मैड यांनी बूथ कमिटीवर काम करणार्या कार्यकर्त्यांची पदे निवडणूकपूर्वी काढून घेण्यात येऊ नयेत, संजय गांगड यांनी विकासात्मक कामे जनतेपर्यंत पोहचावीत, अनिल गटाणी यांनी स्थानिक स्वराज्य संस्थांची निवडणूक कार्यकर्त्यांची निवडणूक असल्याने स्वबळावर लढवावी, विद्या शिंदे यांनी घरकुलांसाठी शासकीय गायरान जमिनी उपलब्ध व्हाव्यात.

पायल ताजणे यांनी ज्या ठिकाणी भापजचे आमदार नाहीत, त्या ठिकाणी पालकमंत्री यांनी थेट संपर्क ठेवून कामे करावीत. विलास वारदे यांनी निवडणूक लढणार्या आणि जिंकणार्या भाजपच्या नेत्यांनी पक्ष संघटना वाढीसाठी प्रयत्न करावेत. गिता गिल्डा यांनी भाजप पदाधिकार्यांनी केवळ मंडळापूर्ते काम करू नयेत. आनंद जगताप यांनी पक्षात नवे-जुने वाद घालू नयेत. सीताराम पंधारे यांनी प्रत्येक मंडळातील पदाधिकार्यांची महिन्यात एक बैठक व्हावी. सुनील यादव यांनी कामे करणार्यांना कार्यकर्त्यांना निवडणुकीत संधी मिळावी. बाळासाहेब गोडे यांनी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीपूर्वी तालुका पातळीवर पदाधिकारी नेत्यांचे कान टोचावे, आदी सूचना केल्या.

पालकमंत्री विखे पाटील यांनी कार्यकर्त्यांच्या सूचना जाणून घेत त्यातील आवश्यक सुधारणा करण्यासोबत पक्षात पुढील महिनाभरात विविध जिल्हा व तालुका पातळीवरील शासकीय समित्यांसह पक्षाच्या अन्य समित्यांवरील सदस्यांच्या निवडी पूर्ण करण्यात येणार आहेत. यासाठी सर्व विभागाच्या जिल्हाध्यक्षांनी इच्छुकांचे अर्ज भरून घ्यावेत. या अर्जात संबंधिताच्या प्रभागात पक्षाच्या उमेदवारांना किती मतदान झाले, याचा तपशील घ्यावा. निवडणुकीत सर्वांना मदत करण्यात येईल, मात्र करण्यात येणारी मदत ही सत्कारणी आवश्यक आहे. ज्यांनी पक्ष संघटनेत पदे घेतलेली आहेत, त्यांना वगळून शासकीय समिती व अन्य समित्यामध्ये स्थान देण्यात येईल. कोणाच्या मागे फिरतो अथवा कोणाचा माणूस म्हणून नियुक्त्या होणार नाहीत, अशा सूचना दिल्या.

## श्रीरामपूरच्या शिंदे सेनेत...

शकले नाही. परिणामी कांबळे यांना पराभवाला सामोरे जावे लागले. याच निवडणुकीच्या तोंडावर उमेदवारीसाठी इच्छुक असलेले पढेगाव येथील तरुण उद्योजक जितेंद्र तोरणे यांनी शिंदे सेनेत प्रवेश केला, मात्र ते उमेदवारी मिळवू शकले नाही.

हिंदुत्वाचा मुद्दा घेऊन विधानसभा निवडणुकीत उतरलेल्या सागर बेग यांनीही ना. एकनाथ शिंदे यांच्याशी संपर्क साधून उमेदवारीची मागणी केली होती. मात्र ती न मिळाल्याने अपक्ष म्हणून निवडणूक लढविणाऱ्या सागर बेग यांनी तब्बल ५० हजारांचा आकडा गाठत तिसऱ्या क्रमांकाची मते मिळविली. ही मते तत्कालीन विद्यमान आमदार लहू कानडे यांच्यापेक्षा जास्त होती. त्यानंतर मात्र शिंदे सेनेने त्यांना सन्मानाने पक्षात प्रवेश दिला.

श्रीरामपूर मधून शिंदे सेनेत प्रवेश करणाऱ्या माजी खा. सदाशिव लोखंडे, माजी आ.भाऊसाहेब कांबळे, युवा नेते जितेंद्र तोरणे, सागर बेग या चार नेत्यांपाठोपाठ आता माजी आ. भानुदास मुरकुटे यांनी आपले राजकीय वारसदार नातू नीरज सिध्दार्थ मुरकुटे यांच्यासह तर माजी उपनगराध्यक्ष संजय छल्लारे यांनी आपल्या समर्थकांसह स्वतंत्र शिंदे सेनेत प्रवेश केल्याने नव्याने प्रवेश करणारांची संख्या सहा झाली आहे.

शिंदे सेनेत प्रवेश करणाऱ्या प्रत्येक नेत्याचे श्रीरामपुरात स्वतंत्र अस्तित्व आहे. त्यात काँग्रेस, जनता दल, शिवसेना, बीआरएस असा प्रवास करुन सध्या कोणत्याही पक्षात नसलेले माजी आ. भानुदास मुरकुटे यांची लोकसेवा विकास आघाडीच्या नावाखाली तालुक्यात मजबूत अशी संघटना आहे. तर माजी आ. भाऊसाहेब कांबळे यांनी दहा वर्षाच्या आमदारकीच्या काळात जमविलेले कार्यकर्ते त्यांच्या पाठीशी आहे. माजी खा. सदाशिव लोखंडे यांनीही दहा वर्षाच्या कार्यकाळात श्रीरामपूरला स्थायिक होत राजकारणात जम बसविण्याचा प्रयत्न केला आहे. जितेंद्र तोरणे यांनीही त्यांच्या प्रतिष्ठाणच्या माध्यमातून विविध उपक्रम राबवून युवकांची फळी उभी करण्यात यशस्वी झाले आहेत. तर सागर बेग यांनी थेट विधानसभा निवडणुकीत उडी घेत त्यांच्या मजबूत अशा युवकांच्या संघटनेच्या जोरावर तसेच हिंदूत्वाचा मुद्दा उठवून ५० हजार मते मिळवत राजकारणात जोरदार 'एन्ट्री' केली आहे.

या सर्व नेत्यांनी स्वतंत्रपणे शिंदे सेनेत प्रवेश केल्याने ते आपले स्वतंत्र अस्तित्व जपण्याचा प्रयत्न करणार यात शंका नाही. त्यात गटबाजी चव्हाट्यावर येऊन पक्षबांधणीत अडचण निर्माण होऊ शकते. त्यामुळे या सहा नेत्यांना एकत्र आणण्याचे 'शिवधनुष्य' पेलणे सोपे नाही. शिवसेना (शिंदे गट) पक्षाच्या राज्यपातळीवरील नेत्यांना ह्या नव्याने पक्षात दाखल झालेल्या सहा तळपत्या तलवारी एका म्यान्यात ठेवण्यात कितपत यश येते हे पाहण्यासाठी एखाद्या निवडणुकीची वाट पहावी लागणार इतकेच!.